# "ग्रामिण महि लांचे आरोग्य आणि घरगुती क्रिया"

**शालिनी रखमाजी थोरात**

**पी.एच.डी संशोधक विद्यार्थीनी,**

**'समाजशास्त्र' विभाग**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.**

प्रस्तावना :

भारत हा जगाच्या संदर्भात मागासलेला देश व अशा मागासलेल्या देशातील ग्रामीण भागातील महिला पुरुषांच्या नजरेत मागासलेल्या असतात, आणि उच्चभ्रू व सवर्ण समाजातील महिलांच्या तुलनेत बहुजन, दलित, मुस्लिम महिला तर अति:मागासलेल्या असतात, हे भारत देशातील ग्रामिण भागातील सामाजिक पर्यावरणातुन दिसुन येते. ग्रामीण भागातील महिला या आर्थिक, राजकिय सामाजिक व धार्मिक अशा परिवेशात राहत असल्यामुळे तरी त्या भिन्न-भिन्न मनोवस्थेच्या पातळीवर जगतांना दिसतात. एकंदर ग्रामीण महिला समाधान व आर्थिक संपन्नता या संदर्भात पुरूषांपेक्षा खुपच मागास आहेत. मागासवर्गीय, दलित, अडाणी, अल्पशिक्षित, बहुजन महिला वर्गामध्ये तर कमालीचे दारिद्रय आढळुन येते.

स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या लोकसंख्येत प्रचंड वाढ झाली असुन सध्या देशाची लोकसंख्या 111 कोटींच्या जवळपास आहे. या महाकाय लोकसंख्येमुळेच भारतासमोर दारिद्रय, कुपोषण, आर्थिक विषमता आणि बेरोजगारी यांसारख्या महासमस्या निर्माण झालेल्या आहेत. विशेषत: देशात दारिद्रयाची समस्या सतत आपले उग्र रुप धारण करतांना दिसत आहे. या दारिद्रयाच्या समस्येचा विळखा ग्रामीण भागातील मागासवर्गीय, अडाणी अल्पशिक्षित, दलित, अनुसुचित जाती-जमातीच्या बहुजन महिलांना अधिक प्रमाणात बसलेला आहे. सन 2001 च्या जणगणनेनुसार भारताच्या एकुण लोकसंख्यामध्ये महिलांची संख्या 48.15 टक्के होती. त्यापौकी 120 दशलक्ष महिला दारिद्रय रेषेखाली जीवन जगत असतांना आढळुन आल्या आहेत. त्यामध्ये ग्रामीण भागातील महिलांचे प्रमाण 70 टक्के पेक्षा अधिक आहे.

दारिद्रय रेषेखाली जीवन व्यतीत करणाऱ्या महिला-पुरूषांमध्ये फक्त महिला वर्गाचेच प्रमाण अधिक असण्याचे कारण काय? हा एक मोठा चिकीत्सेचा विषय आहे. तरीही याचे सर्वसाधारण कारण म्हणजे निसर्गत: महिला-पुरुषांना सामाजिक, आर्थिक, राजकिय, आरोग्य, शौक्षणिक तसेच संवौधानिक अधिकार हे सारखेच असतांनाही या सर्वच क्षेत्रात महिलांचे अस्तित्व पुरुषाच्या अस्तित्वापेक्षा फारच दुय्यम मानले गेले. पर्यायाने सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दर्जात व स्थानात घसरण झाली. ही घसरण प्राचीन काळाच्या उत्तरार्धापासुन खऱ्या अर्थाने होण्यास सुरुवात झाली.

प्राचीन ग्रामीण समाजातील वर्णव्यवस्थेचे रुपांतर जातिव्यवस्थेत झाले. जातिव्यवस्थेने समाजात श्रेष्ठ कनिष्ठत्वाची कधीही न संपणारी उतरंड निर्माण केली. हिंदु संस्कृतीने निर्माण केलेल्या पुरूषप्रधान व्यवस्थेने व जातिव्यवस्थेने महिलांना आर्थिक, सामाजिक, राजकिय, धार्मिक, शौक्षणिक व सांस्कृतिक असे सर्व प्रकारचे समता प्रदान करणारे हक्क नाकारले. महिलांवर ज्ञानबंदी लादुन त्यांना बौध्दिकदृष्टया गुलाम केले. यामुळेच ग्रामीण महिलांचा दर्जा व स्थान पुरूषांच्या तुलनेत दुय्यम झाले व पुरूषांची जीवनाच्या सर्वच क्षेत्रामध्ये एकाधिकारशाही निर्माण झाली. भारतीय समाजाच्या विकासाच्या प्रत्येक कालखंडात काही अपवाद वगळता ग्रामीण महिलांचे स्थान व दर्जा घसरत गेलेला दिसुन येतो.

ग्रामीण महिलांचे आरोग्य :

कोणत्याही राष्ट्राचा विकास हा त्या राष्ट्रात असलेल्या नौसर्गिक साधन सामग्रीवर अवलंबुन असतो. तसाच तो त्या देशातील मानवी संपत्तीवर अवलंबुन असतो. आणि ती मानवी संपत्ती (शारीरिक आणि बौध्दिक आरोग्य) देशातील महिलांच्या आरोग्यावर अवलंबुन असते.

ग्रामीण भागात महिलांचे कुपोषण व अज्ञान यामुळे होणारे मृत्युचे प्रमाण जास्त आहे. ग्रामीण समाजातील राहणीमानाचा दर्जा दिवसेंदिवस खालावलेला दिसुन येत आहे. व महिलांचे आरोग्यही खालच्या पातळीवरचे आहे. ग्रामीण महिला किरकोळ आजाराकडे दर्लक्ष करतात आणि या सततच्या दुर्लक्षतेमुळं गंभीर आजारात रुपांतर होते. दुषित पाणी स्वच्छतेची निकृष्ट व्यवस्था याचबरोबर रुढी परंपरा यामुळे ग्रामीण महिलांच्या आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात. पुरुषाची महिलांशी असलेली बेफिकीरीची वागणुकही या समस्यांना कारणीभुत ठरते. ग्रामीण महिलांना मानसिक ताण, मधुमेह असले आजार होत नाहीत. पण त्या बळी पडतात' निकृष्ट आहार आणि संसर्गजन्य रोगामुळे तसेच ग्रामीण महिलांना शेतात कष्टाची कामे करावी लागतात.

समाजाच्या इच्छेला येईल तसं महिलांनी वागावं अशी ग्रामीण महिलांची स्थिती आहे. सामाजिक रुढी व बंधनामुळ या महिला शिक्षणापासुन वंचित राहतात. जरी महिला ही घरातील मिळवती अशी प्रमुख घटक असली तरी घरात तिला तसं मानाच स्थानही नाही. आणि निर्णय घेण्याचं स्वातंत्र्यही नाही. त्या महिला मुकपणे सगळ सहन करत असतात. ग्रामीण महिला या आजही रुढीबंधन आणि दारिद्रय उपासमार यांच्या कात्रीत सापडलेल्या आहेत. महिलांच्या आरोग्याचा परिणाम तिच्या संपुर्ण कुटुंबावर पडत असतो. वर्तमान काळातील महिला घरकाम आणि बालसंगोपन या कामापुरतीच मर्यादित राहिली नाही. घराबाहेरील आर्थिक प्रक्रियामध्ये स्त्री सहभाग नोंदवित आहे. कुटूंबाचा व्यवसाय, शेती व्यवसाय यात तिचा मोठा सहभाग असतो. ग्रामीण अर्थव्यवस्थेत तर तिचे महत्वपुर्ण योगदान असते. महिलांचे आरोग्य आणि राष्ट्राचा आर्थिक विकास यांचा सहसंबंध असतो. "जागतिक आरोग्य संघटनेनुसार" आरोग्याचा अर्थ एखादा आजार किंवा कमजोरी हा नसुन शारिरीक, मानसिक व सामाजिक रुपात पुर्ण स्वास्थ करणे हा असतो. आरोग्य प्रत्येक व्यक्तीची मुलभुत गरज आणि अधिकार असतो. महिलांच्या आरोग्याच्या संदर्भात अभ्यास महत्वपुर्ण आहे. कारण महिला संपुर्ण लोकसंख्येचा अर्धा हिस्सा असतात आणि एक तृतियांश श्रमशक्ती महिलांमध्ये एकवटलेली असते. भारतात ग्रामीण महिलांच्या आरोग्याविषयी व आरोग्य सुविधा उपलब्धतेविषयी काहीच परिणाम झाला नाही.

निकृष्ट दर्जाचा आहार :-

ग्रामीण भागातील गरिबी, दारिद्रय यामुळे दैनंदिन जीवनात मुलभुत गरजा भागविण्यासाठी

झुंज दयावी लागते. कारण वाढती महागाई व त्यांना मिळणारा रोजागार यामध्ये मोठी तफावत पहावयास मिळते. मध्यमवर्गीय लोकांना सुध्दा सकस आहार घेण्यासाठी बरीच झुंज द्यावी लागते. गरोदरपणात त्यांना आवश्यक आहार न मिळाल्यामुळे व अनेक बाळंतपणामुळे या महिलांना अकाली वृध्दत्व येते. त्यामुळे कुपोषण व आरोग्याच्या असुविधा निर्माण झाल्या आहेत. तसेच ग्रामीण महिलांना पिण्याच्या पाण्याचा व स्वच्छतेच्या साधनांचा अभाव आहे. व स्वच्छता आणि स्नानगृहाच्या सुविधाही उपलब्ध नाहीत. तसेच त्या महिला असुनही त्यांना अनेक आवश्यक त्या सुविधा उपलब्ध नाहीत.

स्वच्छतेच्या साधनांचा अभाव :-

ग्रामीण महिलांना स्वच्छेतेच्या साधनाचा अभाव आहे. त्यांना स्वच्छता व स्नानगृहाच्या सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत, तसेच त्या महिला असुनही त्यांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध नाहीत.

मातृत्वाच्या जबाबदारीचे ओझे :

ग्रामीण महिला या सर्वसाधारणपणे 20 ते 40 या वयोगटातील जास्त प्रमाण आहे. याच वयोगटामध्ये सर्व साधारण त्यांची मुले 6 महिन्यापासून 14 वर्षा पर्यंतची मूले आहेत. या महिलांनी मातृत्त्वाची जबाबदारी देखील पेलावी लागते. त्यांना लहान मुलांचे आजार, स्वच्छता आणि देखरेख देखील करावी लागते. यामुळे ग्रामीण महिलांवरती मानसिक व शारिरीक ताण पडतो.

ग्रामीण महिलांची घरगुती क्रिया :

महिलांनी घरकाम करावे आणि पुरूषाने अर्थोत्पादनाचे काम करावे आणि श्रमविभागणी समाजात चालत आलेली आहे. याचा अर्थ असा की, महिलांनी घरातील सर्व श्रम पार पाडावेत. (बालसंगोपन, स्वयंपाक, धुणीभांडी, धान्य निवडणे-पाखडणे, सारवणे, लिंपणे, कपडे शिवणे, पाणी भरणे, घरातील कपडे, वस्तू निटनेटक्या ठेवणे, झाडणे इ.) ही तीची जबाबदारी आहे. हा शहरी भागातील दंडक ग्रामीण भागातील महिलांनाही लागू आहे.

परंतु महिलांनी शेती कामासाठी श्रम करावेत, पतीला अर्थोत्पादनात साहाय्य करून, पतीच्या ताब्यातील मिळकतीत भर टाकावी हा देखील नियम ग्रामीण भागात अंमलात आहे. घरकाम हे मूलभूत आणि प्रथम क्रमाकांचे तीचे काम आहे. परंतु शेतीतील एकूण मिळकत कमी असल्यामुळे शेतकरी महिलांनी कुटुंबांच्या आर्थिक भल्यासाठी शेतीकामातही सहभाग द्यावा ही प्रथा ग्रामीण भागात स्थिर झालेली आहे. शेतीत कुटुंबातील सारे पुरूष कामे करतात. नांगरणी, वखरणीपासून तर पीके आल्यानंतर बाजारात नेतात. त्यांच्या शेतीमालाला न्याय भाव मिळत नसल्यामुळे त्याच्या हातात त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला येत नाही. परिणामी अधिकाधिक श्रम करणे, चारीच्या किंवा पावसाच्या पाण्याचा जास्तीत जास्त वापर करून अधिकाधिक खेचली जाते. घरकाम अधिक शेतीकाम असे त्यांच्या कामाचे दुहेरी स्वरूप होते. दोन्ही कामांच्या जबाबदाज्या त्यांना पार पाडव्या लागतात.

ग्रामीण भागातील वौशिष्टयपूर्ण भौगोलिक घटक स्त्रियांच्या घरकामाबाबत वौशिष्टयपूर्ण परिस्थिती निर्माण करतात. शेतीकामाशी संबंधित वौशिष्टयपूर्ण आर्थिक आणि ग्रामीण विभागाचे भौगोलिकदृष्टया वेगळेपण यातून अनेक समस्या निर्माण होतात. त्यामुळे

शेतकरी महिलांच्या घरकामावर, तीच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर त्याचे परिणाम होतात. शेती अर्थव्यवस्था आणि त्यांच्या घरकामाच्या श्रमाचे स्वरूपही बदलते.

शोधनिबंधाचे उद्देश :

1. ग्रामीण महिला जीवनाला समानतेचा दर्जा मिळणे आवश्यक आहे.
2. पुरूषप्रधान समाज व्यवस्था ही ग्रामीण महिला जीवनाला कलंकीत करणारी ठरली याचा आढावा घेणे.
3. ग्रामीण भागात धर्मानुसार मुलगा हाच वंशाचा दिवा मानला जातो.
4. असमान दर्जामुळे महिला हिंसाचाराचे प्रमाण सातत्याने वाढते आहे. याचा आढावा घेणे.

गृहितके :

1. ग्रामीण भागातील महिला सक्षमीकरणाला चालना देणे आवश्यक आहे.
2. ग्रामीण भागातील महिलांना कौटुंबिक हिंसाचाराच्या बळीतून त्यांना वाचविले पाहिजे.
3. ग्रामीण भागात स्त्री-पुरुष समानता हे तत्त्व खऱ्या अर्थाने पुरूषप्रधान समाजव्यवस्थेने अंगीकारले पाहिजे.
4. ग्रामीण भागातील महिला कर्तृत्वशील असतात पण त्यांना समानतेची संधी मिळाली पाहिजे.
5. ग्रामीण महिलांच्या आरोग्याकडे शासनाने विशेष लक्ष दिले पाहिजे.

तथ्य संकलन :

प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी द्वितीय स्त्रोतांद्वारे माहिती संकलीत केली आहे. त्यात संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, साप्ताहिक व इंटरनेट यासारख्या साधन सामग्रीचा उपयोग केलेला आहे.

संशोधन आराखडा :

प्रस्तुत अध्ययनासाठी संशोधन विषयाच्या स्वरूपाशी संबंधित वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा वापर करण्यात आला आहे. तसेच अध्ययन, क्षेत्रातून तथ्ये संकलन करण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे.

निष्कर्ष :

1. ग्रामीण महिलांचे जीवन आजही रूढी-परंपरेच्या विळख्यात आहे.
2. ग्रामीण महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण अल्प स्वरूपाचे आहे.
3. ग्रामीण महिलांना राजकारणामध्ये फक्त खुर्चीवर बसवले जाते. व अधिकार सगळे त्यांच्या पतीकडे असते.
4. ग्रामीण महिलांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष हे मोठया प्रमाणावर केलेले दिसून येते.
5. ग्रामीण महिलांकडे शासनाचे काही विशेष लक्ष दिसून येत नाही.
6. ग्रामीण महिलांकडे स्वच्छतेच्या साधनांचा अभाव दिसून येतो.
7. ग्रामीण महिलांना घरकाम व शेतीकाम अशा दुहेरी स्वरूपाच्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात.

समारोप :

ग्रामीण महिलांच्या जीवनाच्या इतिहासाचा आढावा घेतला तर वौदिक, बौध्द आणि जौन कालखंडातच स्त्रियांना सुवर्णयुग मिळालेले होते. इतर कालखंडात मात्र महिला जीवनाची हेळसांड झाली याचा एक स्वतंत्र इतिहास आहे. याला सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे भारतीय समाजातील पुरूषप्रधान समाजव्यवस्था आणि त्यांची मानसिकता होय. हिंदू धर्मातील प्रथा परंपरेने धर्माला महत्त्व देऊन धर्माच्या नावाखाली वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था बळकट केल्या. मनुस्मृतीला अधिष्ठान देऊन महिलांना पुरूषाच्या हातातील बाहुले केले. तिला दासी, गुलाम, लाचार केले गेले. हिनवले गेले केवळ चुल आणि मुल सांभळणारी, उपभोगाची एक वस्तू म्हणूनच तिला मानले गेले. आर्थिक, धार्मीक, शौक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय अधिकारापासून

तिला वंचित ठेवले गेले. त्यामुळे पुरूषप्रधानतेच्या मानसिकतेतून स्त्रियांचे जीवन म्हणजे यातना भोगणारे जीवन बनले. कौटुंबिक हिंसाचारापासून तर अमानवी कृत्य केली गेली. तसेच ग्रामीण महिलांना दिले जाणारे कनिष्ठ स्थान यामुळेच महिलांना पुरूषी वर्चस्वाला बळी पडावे लागत आहे. आणि ग्रामीण महिलांकडे शासनाचे विशेष लक्ष नसल्यामुळे ग्रामीण महिला या दिवसेंदिवस असुरक्षित होत असल्याचे दिसून येत आहे.

संदर्भ सूची :

1. आगलावे प्रदीप (2003) भारतीय समाज : संरचना आणि समस्या, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

2. खौरनार दिलीप (2014) आधुनिक भारतातील सामाजिक समस्या, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद

3. बंडेवार साधना (2014) महिलांसाठी कायदे, ऋचा प्रकाशन, नागपूर

4. गंदेवार एस.एन., भारतीय सामाजिक समस्या

5. खेडकर पुरूषोत्तम (2008) स्त्री–पुरूष तुलना, कैलाश पब्लिकेशन, नागपूर

6. भागवत विद्युत (2003) स्त्री प्रश्नांची वाटचाल आणि शासन

7. कवी माधवी (2000) ग्रामीण स्त्री प्रश्न

8. जाधव निर्मला (2011) भारतीय स्त्रीप्रश्न "ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा, विद्यापीठ," हरिती पब्लिकेशन्स, औरंगाबाद. पृ. 227